# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District** (जिल्हा): उस्मानाबाद **P.S.**(ठाणे): आनंदनगर **Year** (वर्ष): 2019

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0062 **Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 20/02/2019 20:49 बजे

2.

| **S.No.** (अ.क्र.) | **Acts** (अधिनियम) | **Sections** (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): बुधवार **Date From** (दिनांक पासून): 20/02/2019

**Time Period** (कालावधी): पहर 5 **Date To** ( दिनांक पर्यंत): 20/02/2019

**Time From** (वेळेपासून): 14:00 बजे

**Time To** (वेळेपर्यंत): 14:20 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 20/02/2019 **Time** (वेळ): 20:20 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ

**Entry No.** (नोंद 043 **Date & Time** (दिनांक आणि वेळ): 20/02/2019 20:37 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्तळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर): पश्चिम, 1 किमी

**Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): आनंदनगर उस्मानाबाद

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नांव): आनंदनगर

**District(State)** (जिल्हा(राज्य)): उस्मानाबाद(महाराष्ट्र)

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सलमान पाशुमिया शेख

(b) **Wife's Name** (पत्नी का नाव) : पाशुमिया

(c) **Date/Year of Birth** (जन्म 1994 (d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.): **Date of Issue** (अदा केल्याची तारीख):

**Place of Issue** (अदा केल्याची ठिकाण):

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

| **S.No.**(अ. | **Id Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **Id Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | महाळंगी ता जि उ बाद ह मु समुद,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | महाळंगी ता जि उ बाद ह मु समुद,आनंदनगर,उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | दत्ता गुंडाजी जाधव | दत्ता गुंडाजी जाधव | पालक का नाम : गुंडाजी | 1. आनंदनगर उस्मानबाद,आनंदनगर, उस्मानाबाद,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

दिनांक - 20.02.2019-: फिर्याद :-माझे नाव सलमान पाशुमिया शेख, वय 20 वर्षे, व्यवसाय शेती, रा.महाळंगी, ता.जि.उस्मानाबाद हल्ली मुक्काम समृध्दी पेट्रोल पंपासमोर, एमआयडीसी, उस्मानाबाद.असुन मी समक्ष फिर्याद देत आहे की, मी आज दि.20.02.2019 रोजी दुपारी माझे एमआयडीसी, उस्मानाबाद येथील घरातुन माझे ऍक्टीव्हा स्कुटी क्रं. एमएच-25/एए-7299 वर शिवाजी चौकाकडे माझे घरगुती कामानिमित्त जात असताना आनंद नगर पोलीस ठाण्यासमोर आल्यानंतर 7 ते 8 पोलीसांनी माझी गाडी थांबवली. त्यानंतर एक पोलीस माझ्याकडे आला त्याने मला माझे ऍक्टीव्हाचे कागदपत्राची व लायसनची मागणी केली तेंव्हा मी सदर पोलीसाला सांगितले की, ऍक्टीव्हा गाडी ही माझ्या वडीलांच्या नावाने आहे. व वडील कामानिमित्त मुंबई येथे असतात व गाडीचे चालवण्याचे लायसन माझ्याकडे नाही. त्यानंतर मी सदर पोलीसाच्या खाकी ड्रेसवर नेमप्लेट होती त्यावर जाधव असे आडनाव होते. मी सदर पोलीसाला सांगितले की, जो काय कायदेशीर दंड असेल तो दंड भरुन मला पावती दया त्यावर जाधव पोलीस मला म्हणाले तुला दंड भरण्याची लय हाऊस आहे काय ? त्यावर मी जाधव यांना म्हणालो साहेब माझ्याकडे गाडीचे कागदपत्रे व लायसन नाहीत त्यामुळे माझी चुक मी कबुल करतो त्यामुळे मी दंड भरायला तयार आहे. त्यानंतर जाधव पोलीस यांनी माझ्याकडे मी काय करतो? मी कोठे राहतो ? माझे वडील काय करतात? याबाबत मला विचारपुस केली व मला म्हणाले तु 5000/- रुपये घेवुन ये मी तुझी गाडी सोडतो मी जाधव यांना म्हणालो की, साहेब 5000/- रुपये दंड आहे का तेंव्हा जाधव मला म्हणाले तु जरी दंड भरला तरी तुझ्याकडे कागदपत्रे नाहीत त्यामुळे मी तुझी गाडी जप्त करील तेंव्हा तु 5000/- रुपये आणुन दे आणि गाडी घेवुन जा सरकारी पावतीच्या भानगडीत पडु नको, तुला ती परवडणार नाही, मला पैसे दे आणि गाडी घेवुन जा.असे म्हणाले त्यामुळे मी जाधव पोलीस यांचेवर कार्यवाही होणेसाठी लाप्रवि कार्यालय उस्मानाबाद येथे जाऊन पोलीस उपअधीक्षक गावडे यांच्याकडे तक्रार सांगितली. त्यानंतर मला पोलीस उपअधीक्षक श्री गावडे यांनी पोनि बहिर यांचा परिचय करुन देवुन पोनि बहिर यांच्याकडे मला श्री गावडे यांनी पाठविले. त्यानंतर पोनि बहिर यांनी त्यांचा व माझा आपसी परिचय करुन दिला व मला पोनि बहिर यांनी सापळा कार्यवाहीबाबत सविस्तर माहिती दिली व मी सापळा कार्यवाहीसाठी तयार असलेबाबत पोनि बहिर यांना सांगितले त्यानंतर पोनि बहिर यांनी माझ्याकडे तोंडी तक्रारीबाबत विचारणा केली तेंव्हा मी माझी तोंडी तक्रार पोनि बहिर यांना सांगितली त्यानंतर पोनि बहिर यांनी माझी तोंडी तक्रार त्यांच्या कर्मच्या-यास सांगुन संगणकावर टंकलिखीत करुन घेतली त्यानंतर संगणकावर टंकलिखीत तक्रार मला वाचण्यास दिली सदरची तक्रार मी वाचुन खरी असल्याची खात्री करुन त्यावर मी सही केली.त्यानंतर माझ्यासमक्ष पोनि बहिर यांनी सुध्दा सदर तक्रारीवर सही केली तसेच मी माझे आधार कार्डचे झेरॉक्स प्रत दिली. त्यानंतर काही वेळाने पोनि बहिर यांनी माझी दोन शासकीय पंच व त्यांचे कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची ओळख करुन दिली त्यानंतर पोनि बहिर यांनी मला दोन पंचासमक्ष माझी तक्रार सांगण्यास सांगितली असता मी माझी तक्रार दोन्ही पंचासमक्ष सांगितली त्यानंतर पोनि बहिर यांनी संगणकावर टंकलिखीत केलेली माझी तक्रार दोन्ही पंचांना वाचण्यास दिली सदरची तक्रार दोन्ही पंचांनी वाचुन पाहिली मी सांगितलेली तोंडी

तक्रार व संगणकावर टंकलिखीत केलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाल्यावर दोन्ही पंचांनी सहया करुन सदरची तक्रार पोनि बहिर यांनी स्वत:कडे घेतली.त्यानंतर पोनि बहिर यांनी दोन्ही पंचासमक्ष सांगितले की, जाधव पोलीस हे माझी ऍक्टीव्हा गाडी सोडण्यासाठी लाचेची मागणी करतात किंवा कसे याबाबत आज रोजी पंचासमक्ष लाचमागणी पडताळणी करणार असल्याचे सांगितले, सदर लाचमागणी पडताळणी दरम्यान डिजीटल व्हईस रेकर्डरचा वापर करण्यात येणार असल्याबाबत सांगितले.त्यानंतर पोनि बहिर यांनी लाचमागणी पडताळणीच्या अनुशंगाने घ्यावयाच्या खबरदरीच्या सुचना मला पंच क्रं.1 व पंच क्रं.2 यांना दिल्या तसेच मला व दोन्ही पंचांना पोनि बहिर यांनी डिजीटल व्हइस रेकर्डरचे प्रात्यक्षिक करुन दाखविले. त्यानंतर पोनि बहिर यांनी एक नवीन मेमरी कार्ड व्हइस रेकर्डरमध्ये टाकुन व्हईस रेकर्डर चालु करुन त्यामध्ये कोणतेही संभाषण ऐकु येत नसलेबाबत खात्री करुन दिली. त्यानंतर पोनि बहिर यांनी सांगितले की, माझे व जाधव पोलीस यांचेत होणारे मुळ संभाषण व्हईस रेकर्डरमधील मेमरी कार्ड मध्ये रेकर्ड होणार असलेबाबत सांगितले.त्यानंतर पोनि बहिर यांनी व्हईस रेकर्डर चालु करुन माझे शर्टला आतमध्ये पीनने लावुन मला व पंच क्रं.1 यांना त्यांचे कार्यालयातील मोटारसायकलवर जाधव पोलीस यांची भेट घेण्यासाठी रवाना केले त्यावरुन मी व पंच क्रं.1 असे दोघे मिळुन पोलीस ठाणे आनंद नगर येथे गेलोत पोस्टे आनंद नगर येथे गेल्यानंतर माझे जाधव साहेब यांच्यासोबत माझी ऍक्टीव्हा गाडी सोडण्यासंदर्भात बोलणे झाले त्यावेळी जाधव पोलीस यांनी मला माझी ऍक्टीव्हा गाडी सोडण्यासाठी 5000/- रुपयाची मागणी केली तेंव्हा मी जाधव पोलीस यांना सांगितले 5000/- रुपये माझ्याकडे नाहीत तेंव्हा जाधव पोलीस मला म्हणाले की, 3000/- रुपये दे तेंव्हा मी माझ्याकडे 3000/- रुपये सुध्दा जमणार नाही असे सांगितले त्यानंतर जाधव पोलीस व माझ्यात तडजोड होवुन जाधव पोलीस यांनी माझ्याकडे 1500/- रुपये व आधार कार्डची झेरक्स घेवुन येण्यास सांगितली. त्यानंतर मी व पचं क्रं.1 असे दोघे मिळुन मोटारसायकलने एसीबी कार्यालय उस्मानाबाद येथे हजर आलोत.त्यानंतर पोनि बहिर यांनी माझ्या ताब्यातील व्हईस रेकर्डर घेवुन बंद करुन मला व पंच क्रं.1 यांना पंच क्रं. 2 यांच्यासमक्ष हकीकत विचारली असता मी व पंच क्रं.1 यांनी वरील प्रमाणे घडलेली हकीगत सांगितली. त्यानंतर पोनि बहिर यांनी व्हईस रेकर्डर चालु करुन माझ्या व दोन्ही पंचासमक्ष ऐकवली व संभाषणाबाबत पोनि बहिर यांनी मला व पंच क्रं. 1 यांना विचारपुस केली असता आम्ही ऐकल्याप्रमाणेच संभाषण झाले असल्याबाबत पंच क्रं. 2 यांच्यासमक्ष सांगितले.त्यानंतर पोनि बहिर यांनी दोन्ही पंच सापळा पथक व माझ्यासोबत विचारविनीमय करुन जाधव पोलीस यांच्याविरुध्द दिनांक 20.02.2019 रोजी लाचेच्या सापळयाचे आयोजन करण्याचे ठरले त्यानंतर पोनि बहिर यांनी कार्यालयात संगणकावर कामकाज केले.त्यानंतर पोनि बहिर यांनी सांगितले की, सापळापुर्व कार्यवाही करण्यात येणार आहे त्यानंतर पोनि बहिर यांच्या सुचनेवरुन माझ्याजवळील सर्व रोखरक्कम व चिज वस्तु टेबलावर काढुन ठेवली त्यानंतर माझी पंच क्रं.1 यांनी अंगझडती घेवुन मी हजर केलेल्या लाचेच्या नोटांना ऍन्थ्रासिन पावडर लावणे, ऍन्थ्रासिन पावडरचे उपयोग, ऍल्ट्राव्हायोलेट दिव्याचा उपयोग व गुणधर्म, त्याचे प्रात्यक्षिक दाखवुन तसेच लाचेच्या नोटांची अंधारात ऍल्ट्राव्हायोलेटच्या दिव्याखाली तपासणी वगैरे कार्यवाही केल्यानंतर पोह कठारे यांनी लाचेच्या नोटा माझ्या पन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिशात ठेवल्या त्यानंतर लाच स्विकृतीनंतर डावा हात डोक्याच्या केसावरुन फिरवणेबाबत ईशारा मला नेमुण दिला. त्यानंतर पोनि बहिर यांनी मला सापळा कार्यवाहीच्या अनुशंगाने सविस्तर सुचना दिल्या.त्यानंतर आज दिनांक 20.02.2019 रोजी पोनि बहिर यांनी मला सविस्तर सुचना देवुन व्हईस रेकर्डर चालु करुन देवुन लाच रक्कम जाधव पोलीस यांना देण्यासाठी पंचासह एसीबी कार्यालय उस्मानाबाद येथुन मोटारसायकलवरुन रवाना केले. त्यानंतर मी पंचासह जाधव पोलीस यांची भेट घेण्यासाठी आनंद नगर पोलीस ठाण्यात गेलो. पोलीस ठाणे आनंद नगर येथे जाऊन जाधव पोलीस यांचा शोध घेतला असता मला जाधव पोलीस हे मिळुन आले नाहीत. त्यावरुन मी पोलीस ठाणे आनंद नगरचे इमारतीचे बाहेर आलो व जाधव पोलीस यांना फोन केला तेंव्हा मला जाधव पोलीस म्हणाले पोलीस ठाण्याच्या गेटसमोर थांब त्यानंतर मी पोलीस ठाण्याच्या गेटसमोर थांबलो काहीवेळाने जाधव पोलीस हे माझ्याजवळ मोटारसायकलने हजर आले व मला त्यांनी माझे ऍक्टीव्हा गाडीची चावी दिली त्यानंतर मी पोलीस ठाणे आनंद नगर मध्ये जाऊन माझी ऍक्टीव्हा गाडी घेवुन जाधव पोलीस यांच्याजवळ आलो तेव्हा मला जाधव म्हणाले बस गाडीवर तेंव्हा मी जाधव यांना म्हणालो की, ठिक आहे परंतु मला पोनि बहिर यांनी गाडीवर बसुन न जाण्याबाबत सुचना दिली होती. त्यानंतर मला जाधव साहेब यांनी उजव्या हाताने पैसे देण्याबाबत इशारा केला तेंव्हा मी उजव्या हाताने माझे पन्टचे समोरील उजव्या खिशातुन लाच रक्कम रुपये दीड हजार रुपये काढुन जाधव यांच्यासमोर धरली असता जाधव यांनी सदरची लाच रक्कम उजव्या हाताने घेवुन दोन्ही हाताने मोजुन त्यांचे मोटारसायकलचे समोरील हेडलाईटचे बक्समध्ये असलेल्या गाडी पुसावयाचे पांढ-या कपडयात ठेवुन कपडयासह लाच रक्कम मोटारसायकलचे हेड लाईटचे कप्यात ठेवुन दिली. त्यानंतर मी जाधव यांनी पैसे घेतल्यानंतर करावयाचा नेमुण दिलेला पुर्वनियोजीत इशारा केला ती वेळ 14.20 वाजण्याची होती. त्यावेळी आपण पंच व आपला स्टाफ माझ्याजवळ येत असताना जाधव पोलीस यांनी सापळा पथकातील सदस्यास पाहिले व लागलीच त्यांची गाडी चालु करुन समोरील पेट्रोलपंपाचे बाजुस जाणारे रोडने मोटारसायकलने जोरात निघुन गेले त्यानंतर पोनि बहिर, पंच क्रं.2 व सापळा पथकातील सदस्य हे जाधव पोलीस यांच्या गाडीच्या पाठीमागे मोटारसायकलने निघाले मी व पंच क्रं.1 असे जागेवर उभे राहिलोत.त्यानंतर थोडयावेळाने पोना कुंभार हे माझ्याजवळ आले व त्यांनी माझ्या ताब्यातील व्हईस रेकर्डर काढुन घेवुन बंद केला. त्यानंतर काही वेळाने पोनि बहिर हे माझ्याजवळ आले व काळया कपडयाचा अंधार करुन माझ्या हातांची कपडयांची अल्ट्राव्हायोलेटचे दिव्याखाली तपासणी केली तेंव्हा माझे उजव्या हातावर फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली तसेच माझे पन्टचे समोरील उजव्या बाजुच्या खिशाचे तोंडास व आतील बाजुस फिक्कट हिरव्या रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर पंचांनी माझी अंगझडती घेवुन माझ्याकडील सामानाची दिव्या खाली तपासणी करुन माझे सामान मला परत दिले. त्यानंतर पोनि बहिर व मी तसेच पंच असे मिळुन बाळासाहेब ठाकरे नगराकडुन पश्चिमेकडे एका ज्वारीच्या शेतात गेलो तेंव्हा ज्वारीमध्ये जाधव पोलीस यांची पशन प्रो मोटारसायकल क्रमांक एमएच 24/ एसी 4274 ही पोलीस निरीक्षक बहिर यांनी दाखविली व दोन्ही पंचासमक्ष जाधव यांचे मोटारसायकलमध्ये ठेवलेली लाच रक्कम रुपये 1500/- रुपयाची पंचांनी पडताळणी केली.त्यानंतर पोनि बहिर हे मला एसीबी कार्यालय उस्मानाबाद येथे घेवुन आले एसीबी कार्यालय उस्मानाबाद येथे आल्यानंतर पोनि बहिर यांनी मला पंचासमक्ष विचारणा केली की, जाधव पोलीस यांना लाच रक्कम देण्यासाठी रवाना केलेपासुन इशारा करेपर्यंत घडलेली हकीगत सांगावी त्यावर मी वरील प्रमाणे हकीगत सांगितली.एकदंरीत मी दिनांक 20.02.2019 रोजी जाधव पोलीस पोलीस ठाणे आनंद नगर हे मला माझी ऍक्टीव्हा गाडी क्रमांक एमएच 25/ एए 7299 ही सोडवण्यासाठी पैसे मागत असल्याबाबत मी दिलेल्या तक्रारीवरुन पोनि बहिर यांनी पंचासमक्ष दिनांक 20.02.2019 रोजी लाचमागणी पडताळणी केली असता जाधव पोलीस यांनी माझ्याकडे माझी ऍक्टीव्हा गाडी सोडवण्यासाठी 5000/- रुपयाची मागणी करुन दिनांक 20.02.2019 रोजी पोलीस ठाणे आनंद नगर समोरील रोडवर माझ्याकडुन जाधव पोलीस यांनी तडजोडीअंती 1500/- रुपयाची मागणी करुन 1500/- रुपये घेतले असता पोनि बहिर यांनी जाधव पोलीस यांना लाचेच्या रकमेसह पकडण्याचा प्रयत्न केला असता जाधव पोलीस हे त्यांच्याजवळ असलेल्या मोटारसायकलने पळुन गेले. त्यानंतर जाधव पोलीस यांची मोटारसायकल लाचेच्या रकमेसह मिळुन आली. त्यामुळे दत्ता गुंडाजी जाधव, व्यवसाय नौकरी, पोलीस शिपाई, नेमणुक पोलीस ठाणे आनंद नगर, ता. जि. उस्मानाबाद यांचेविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यासाठी मी माझी फिर्याद देत आहे.हिच माझी फिर्याद असुन सदरची फिर्याद मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे.समक्ष

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): Rajendra Sidram Bokade(I (Inspector)) / PBMH70411 **or**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे **Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अमलदार
पोलीस ठाणे
आनंद नगर, उस्मानाबाद

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाम): Rajendra Sidram Bokade
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PBMH70411

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known /**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म | Build (बांधा) | Height (cms.) (उंची | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)